TCPC
SINCE 1959

सैनिक कल्याण विभाग (म. राज्य) पुणे
माजी सैनिक प्रशिक्षण व उत्पादन केंद्र, सातारा
करंजे नाका, सातारा – ४१५ ००२
Training Cum Production Centre for Ex-Serviceman
Karanje Naka, Satara - 415 002
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
Phone:- (०२१६२)२३१०३४, Mob:- ९९७०१६११२६ Web Site : www.tcpcsatara.com Email :- tcpcsatara1959@gmail.com

टीसीपीसी/भांडार/साहित्य मागणी/ टेंडर-०१/२०२६-२७/ ४९०. दि.२१/०८/२०२६.

निविदा क्र.टीसीपीसी/भांडार/साहित्य खरेदी/०१/२०२६-२७

विषय :- TCPC केंद्रास आवश्यक कच्चा माल (Raw Material) खरेदीसाठी पात्र पुरवठादारांकडून ऑनलाईन पद्धतीने निविदा मागविणे बाबत.

१. टीसीपीसी केंद्राच्या विविध उत्पादन/कामकाजासाठी आवश्यक असलेला कच्चा माल खरेदी करण्यासाठी पात्र उत्पादक/अधिकृत वितरक/पुरवठादार यांच्याकडून दरपत्रकासह निविदा (Tender) मागविण्यात येत आहेत.

२. इच्छुक पुरवठादारांनी खाली नमूद केलेल्या अटी व तांत्रिक specifications नुसार आपली निविदा सादर करावी.

## कच्चा माल तपशील

| अ.क्र. | कच्चा मालाचे नांव | परिमाण |
|---|---|---|
| ०१ | M S चौरस पाईप १"x१" कॉइल (०९ कि.) | ८२० रनिंग फूट |
| ०२ | M S अँगल २५x२५x३ | ४०० रनिंग फूट |
| ०३ | सनमायका नॅचरल ०.८mm | ३२० चौ.फूट (१० नग) |
| ०४ | प्लायवूड १८mm ८x४ (IS ३०३ ग्रेड) M.R | १२८० चौ.फूट (४० नग) |
| ०५ | प्लायवूड १२mm ६x३ (IS ३०३ ग्रेड) M.R | ७२० चौ.फूट (४० नग) |
| ०६ | प्लायवूड ०६mm ८x४ (IS ३०३ ग्रेड) M.R | ६४० चौ.फूट (२० नग) |

## ३. निविदाधारकासाठी पात्रता/नियम व अटी :-

अ. निविदा धारकाने निविदा ही केंद्राचे अधिकृत पोर्टल www.tcpcsatara.com या संकेत स्थळावरून ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे.

आ. निविदाधारक हा संबंधीत कच्चा मालचा उत्पादक/अधिकृत वितरक/मान्यताप्राप्त पुरवठादार असावा व त्याच्याकडे वैध असलेली नोंदणी व परवाने आवश्यक आहेत.

इ. निविदाधारकाने प्रत्येक कच्चा मालाचा प्रति युनिट दर स्पष्टपणे नमूद करावा.

उ. दरामध्ये GST,वाहतुक,लोडिंग-अनलोडिंग, पॅकिंग व इतर खर्च समाविष्ट आहेत किंवा नाहीत हे स्पष्ट नमुद करावे.

ऊ. दरपत्रकात कोणतीही खाडाखोड असल्यास त्यावर अधिकृत स्वाक्षरी असणे आवश्यक आहे..

ए. निविदेमध्ये नमूद केलेले दर किती दिवसांसाठी वैध राहतील हे स्पष्ट नमुद करावे.

ऐ. केंद्रास आवश्यकतेनुसार संपुर्ण किंवा अंशत: प्रमाणात माल खरेदी करण्याचा अधिकार राहील.

## ४. गुणवत्तेबाबत अटी :-

अ. पुरवठा करण्यात येणारा कच्चा माल निविदेत नमूद केलेल्या Specification/Grade/Quality Standards नुसार असणे आवश्यक आहे.

पा न क्र.०२ . . .

**ब.** वर नमुद केलेल्या तपशीलानुसार किंवा गुणवत्ता निकष पुर्ण न करणारा माल TCPC केंद्राकडून खरेदी केला जाणार नाही. केंद्राने नाकारलेला माल पुरवठादाराने स्वत:च्या खर्चाने परत घेऊन त्याऐवजी आवश्यक गुणवत्तेचा माल पुरवठा करावा.

**५. पुरवठ्याबाबत अटी :-**

**अ.** पुरवठा आदेश (Purchase Order) मिळाल्यानंतर **०५ दिवसांच्या** आत पुरवठा धारकाने मालाचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

**ब.** मालाच्या पुरवठयासोबत पुरवठाधारकाने Tax Invoice आणि Deliver Challan देणे आवश्यक आहे.

**६. देयका बाबत :-**

**अ.** मालाचा पुरवठा हा दिलेल्या तपशीलानुसार व गुणवत्तेनुसार आहे याची खात्री करुन देयकाच्या आधारे देयकाची रक्कम मालाचा पुरवठा झालेनंतर **२-३ दिवसांच्या** आत ऑनलाईन पद्धतीने आपले बँक खात्यावर वर्ग/जमा (NEFT/RTGS) पद्धतीने वर्ग करण्यात येईल.

**ब.** लागू असलेले कर व कायदेशीर कपाती कंपनीच्या नियमांनुसार करण्यात येतील.

**७. केंद्राचा अधिकार :-**

**अ.** प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकारी केंद्रास राहील तसेच निविदा स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे कारण निविदा धारकांस देणे केंद्रास बंधनकारक असणार नाही.

**ब.** आवश्यकते नुसार निविदेतील प्रमाणपत्र बदल करण्याचा अधिकारी केंद्रास राहील

**क.** निविदा प्रक्रियमध्ये आवश्यक असल्यास अतिरिक्त माहिती/कागदपत्रे निविदा धारकांकडून मागविण्याचा अधिकार केंद्रास राहील तसेच निविदा प्रक्रियेशी संबंधीत अंतिम निर्णय TCPC केंद्राच्या अधिकृत खरेदी समितीस राहील.

T.C.P.C. SATARA

**व्यवस्थापक**
**माजी सैनिक प्रशिक्षण व उत्पादन केंद्र**
**करंजे नाका, सातारा**